ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - X Issue - I August - January - 2021-22

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.631
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | महाराष्ट्रातील साक्षरता प्रमाण : एक अभ्यास<br>**मनिषा भिमराव चव्हाण** | ५८-६३ |
| १५ | पांचाळेश्वर क्षेत्राचा पर्यटन दृष्ट्या विकास: सद्यस्थिती व संभाव्यता<br>**मुकुंद उदरभरे** | ६४-६६ |
| १६ | Covid-19 चा भारतीय आयटी क्षेत्रावर झालेला आर्थिक परिणाम<br>**डॉ. सीमा रविंद्र चव्हाण** | ६७-७० |
| १७ | कोविड-१९ चा महिलांवरील झालेला परिणाम<br>**प्रा. डॉ. सुपेकर वैशाली प्रशांत** | ७१-७४ |
| १८ | कोव्हिड १९ चा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम<br>**डॉ. विष्णू नामदेव लांडे** | ७५-७८ |
| १९ | भारतातील ग्रामीण समाजावर कोविड-१९ चा झालेल्या परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. सुहास बी. नांद्रे** | ७९-८२ |
| २० | शेतमालाच्या आधारभूत किंमती व महागाई निर्देशांकाच्या सहसंबंधाचा चिकित्सक अभ्यास<br>**मोरे योगिता सुभाष**<br>**प्रा. डॉ. व्ही. बी. बैरागी** | ८३-८८ |
| २१ | भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रादेशिक विषमतेचा परिणाम<br>**प्रा. एम. पी. चोपडे** | ८९-९३ |
| २२ | कोविड-१९ चा भारताच्या कृषीक्षेत्रावर झालेला परिणाम - एक अभ्यास<br>**श्रीमती. शेवाळे वर्षा राजेंद्र** | ९४-९६ |
| २३ | कोरोनाचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम अभ्यासने<br>**डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे** | ९७-१०० |
| २४ | कोविड-१९ चे सामाज व अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>**डॉ. मयुरी राजेश्वरराव फुके** | १०१-१०४ |
| २५ | कोरोना-१९ काळातील लॉकडाऊन एक संधी व आव्हान (समाजशास्त्रीय अध्ययन)<br>**प्रा. डॉ. सुधा मु. खडके (कडू)** | १०५-१११ |
| २६ | कोवीड काळात पोषक आहाराचा स्वास्थावर परिणाम<br>**प्रा. कु. सुषमा जयकुमार फरसोले** | ११२-११५ |




Scanned with CamScanner

VOLUME - X, ISSUE - I - AUGUST - JANUARY - 2021-22
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.631 (www.sjifactor.com) AP-11

# १७. कोविड-१९ चा महिलांवरील झालेला परिणाम

प्रा. डॉ. सुपेकर वैशाली प्रशांत
राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर.

**प्रस्तावना**

२०१९ मध्ये चीन मधून वुहान येथून सुरु झालेल्या कोविड १९ या महामारीचा परिणाम जगातील अनेक देशांवर आणि जवळपास सर्वच घटकांवर परिणाम झाल्याचे आज समोर दिसून आले आहे.या महामारीची भयावहता आणि त्याच्या बद्दलची भीती ही सगळीकडे दिसून आली.कोविड हा शारीरिक आरोग्यास तर घातक आहेच मात्र त्याचा मानसिक स्थितीवर,भावनांवर अतिशय वाईट परिणाम झाला. समाजात महिला या तर अतिशय संवेदनशील घटक आहेत.ल्यंसेट रिपोर्ट (२०२०) च्या सर्वेक्षनानुसार, कोविड १९ च्या काळात कोणत्याही देशात या महामारीचा लिंग आधारित झालेला परिणामाचा अभ्यास शासकीय आरोग्य संस्थांकडून झालेला नाही.प्लान इंटरनॅशनल (२०२०)च्या नुसार सर्वेक्षनानुसार, कोविड मुळे मानवी जगण्यात फार मोठे अडथळे निर्माण झालेले आहेत त्याच बरोबर विवाह संस्था,कुटुंब संस्था यांनाही मानसिक आणि आर्थिक दडपणाखाली रहावे लागले.सामाजिक अलगाव किंवा अंतर राखण्याच्या आवश्यकतेमुळे महिलांच्या अत्याचारामध्ये,गैरवर्तनामध्ये किंवा त्यांच्या होणाऱ्या शोषनाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे वाढ झाली आहे. कोविड १९ च्या महामारीमुळे स्त्रिया आणि पुरुष यांचा त्यांच्या दैनदिन कार्यात वेगवेगळ्या प्रकारे प्रभावित केले आहे. आणि याचा अभ्यास प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये करण्यात आलेला आहे.

साथीच्या रोगाचे प्राथमिक परिणाम असले तरी, दुय्यम परिणाम देखील आहेत, जे बहुधा धोरणात्मक चर्चेत चुकले जातात, परंतु ज्याचे खोल सामाजिक आणि राजकीय परिणाम आहेत. जेव्हा लैंगिक-विभक्त डेटा गहाळ किंवा अपूर्ण असतो तेव्हा हे परिणाम समजणे आणि सोडवणे अधिक कठीण असते. दुर्दैवाने, प्रभावित देशांनी अद्याप त्यांचा राष्ट्रीय लैंगिक विभक्त डेटा जाहीर केला नाही, जे लिंग-संवेदनशील पद्धतीने सर्जनशील नियोजन किंवा तयारीच्या प्रयत्नांना गंभीरपणे अडथळा आणत आहे (**Sandoiu** 2020). अशाप्रकारे, हे महत्त्वाचे आहे की सरकारांनी कोविड -१ मुळे झालेल्या नुकसानीची व्याप्ती ओळखली पाहिजे की महामारीचा स्त्रिया आणि पुरुषांवर कसा परिणाम होतो हे शोधन्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा एखाद्या संकटाबद्दल आपण बोलतो, तेव्हा आधीच वाढलेल्या असुरक्षितेचा समुदायावर काय परिणाम होतो याचा विचार झाला पाहिजे.कोविड ला प्रतिबंध म्हणून अलगीकरणाचा पर्याय स्वीकारण्यात आला, त्या काळात स्त्रियांवर जास्त प्रमाणात अत्याचार झालेला दिसून येतो.महिलांवरील अत्याचाराच्या सर्वात जास्त घटना भारतात उत्तर प्रदेशमध्ये घडल्या. शाळा, नोकरी, व्यवसाय, उद्योग बंद



Scanned with CamScanner

पडल्याने पुरुष आणि इतर सदस्य घरात असल्याने, त्यांच्या सततच्या नैराशाचा परिणाम स्त्रीवरील अत्याचारामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**उद्दिष्टे**

1. कोविड १९ चा लैंगिक परिणाम समजून घेणे.
2. व्यक्ति आणि समुदाय म्हणून स्त्रियांवर काय परिणाम झाला त्याचा अभ्यास करणे.
3. स्त्रियांना विविध प्रक्रियांमध्ये सामावून घेण्यासाठी आणि त्यांच्यावरील अत्याचाराचा उद्रेक रोखण्यासाठी उपाय-योजना सुचविणे.

कोव्हिड-१९च्या महासाथीत महिलांवर होणाऱ्या अत्याचारावर क्लेअर वेनहम व त्यांच्या काही सहकार्यांनी संशोधनपर अहवाल सादर केला आहे. त्यात त्यांनी अनेक महत्त्वाच्या नोंदी केल्या आहेत. त्यांच्या मते प. आफ्रिकेत इबोला विषाणूची महासाथ पसरल्यानंतर शाळा बंद करण्यात आल्या होत्या. या निर्णयामुळे मुलींच्या शिक्षणावर, त्यांच्या जगण्याच्या संधींवर विपरित परिणाम झाला. अनेक मुलींना शाळा सोडावी लागली, अल्पवयीन मुलींमध्ये गर्भधारणांच्या घटना वाढलेल्या दिसून आल्या. त्याचबरोबर महिलांना घरगुती व लैंगिक हिंसाचारालाही सामोरे जावे लागले. या घटनाही वाढू लागल्या. मुलांकडे सतत लक्ष द्यावे लागत असल्याने अंतिमतः महिलांच्या अर्थार्जनावरही त्याचा परिणाम झाला. राष्ट्रीय महिला आयोगाने मार्च २०२० च्या पहिल्या आठवड्यात घरगुती हिंसाचारासंबंधी अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात महिलांच्या तक्रारींत दुपटीने वाढ झाल्याचं दिसून आलं. तक्रारींचा आकडा ११६ वरून २५७ वर पोचल्याचं त्यात म्हटलंय. त्यातही अधोरेखित करावी अशी बाब म्हणजे लॉकडाउनच्या पहिल्या दहा दिवसांतच वाढलेल्या या केसेस आहेत. त्यात ६९ केसेस महिला हिंसाचाराच्या आहेत

गेल्या आठवड्यात संयुक्त राष्ट्रांच्या महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी देखील लॉकडाऊनच्या काळात महिलांवर होणाऱ्या घरगुती हिंसाचारावर चिंता व्यक्त केली. 'महिलांना जिथे सर्वाधिक सुरक्षित वाटायला हवं अशी जागा म्हणजे त्यांचं घर. पण, आपल्या स्वतःच्या घरातच सर्वाधिक असुरक्षित वातावरणाचा आणि भीतीचा सामना बहुतांश मुलींना आणि महिलांना करावा लागतो, हे आजचं कटू आणि विसंगत वास्तव आहे,' असं त्यांनी म्हटलंय. लॉकडाउनमध्ये महिलांवर वाढलेला अत्याचार ही समस्या शब्दशः जागतिक आहे. कोरोनाने सर्वाधिक मानवी मृत्यू झालेल्या देशांपैकी एक असणाऱ्या इटलीतही महिला सुरक्षित राहिलेल्या नाहीत. इटली हा एक पुढारलेला समाज म्हणून ओळखला जातो. पण तिथेही महिलांना पुरुषांच्या अत्याचाराला सामोरे जावं लागतंय. यावर उपाय म्हणून आता इटाली सरकारने एक अँप लॉंच केलंय, जिथे फक्त महिला मेसेज करून तक्रार नोंदवू शकतात. जो पुरुष घरातल्या महिलेवर हिंसाचार करेल त्याला घराबाहेर जावं लागेल आणि ती महिला आपल्या मुलांबरोबर घरी थांबेल, अशी व्यवस्थाच तिथल्या सरकारने केलीय. एका वर्षाच्या तुलनेत इटलीमधील स्ट्रेस कॉल २० टक्याने अधिक



Scanned with CamScanner

वाढले आहेत आणि व्हॉट्सअॅपवर महिलांकडून पाठविल्या जाणाऱ्या समस्यांच्या संदेशांत देखील २० टक्के वाढ झाली आहे, असं इटली सरकारने प्रसिध्द केलंय.

स्पेनमध्ये पोलिसांनी घरी अडकलेल्या महिलांसाठी व्हॉट्सअॅप सेवा सुरू केली आहे. नवरे घरी असताना त्यांच्याबाबतच्या तक्रारी फोन कॉल करण्याची आवश्यकता न पडता नोंदवता याव्यात, यासाठी महिलांकरिता असणारी ही सुविधा तयार करण्यात आली आहे. स्पेनच्या पोलिसांच्या म्हणण्यानुसार (समतेसाठी कार्यरत असणारे मंत्रालय) लॉकडाऊन सुरू झाल्यापासून त्यांच्या कामाची व्याप्ती, समुपदेशन आणि स्त्री-पुरुष समतेच्या प्रश्नांच्या सल्लामसलतीत तब्बल २७० टक्क्यांनी वाढ झाली आहे. स्पेनमधीलच प्रसिद्ध अशा 'मुखवटा' मोहिमेप्रमाणेच, घरगुती हिंसाचाराला बळी पडलेल्यांना मदत मागता यावी यासाठी आणि त्यांच्या शेजाऱ्यांना व अधिकाऱ्यांना सतर्क करण्यासाठी पीडितांच्या तळहातावर लाल ठिपका काढण्यास सांगितलं आहे.

मानवी हक्काच्या अनुषंगाने विचार केला असता,कोरोनाच्या काळात हे पूर्ण उघड झाले आहे की, स्त्री-पुरुष समानता अजूनही पूर्ण आस्तित्वात आली नाही.पुरुष प्रधान मूल्ये,स्त्रियांचे आर्थिक परावलंबन, त्यांचे दुय्यम स्थान हे आजही चिंतेचे विषय आहेत.लॉकडाऊन संपेपर्यंत माझी दुसरीकडे कुठे तरी राहण्याची सोय करा कारण घरातील मारहाणीला मी कंटाळले आहे,पोलिसात तक्रार करून काही उपयोग नाही. असा मेल एका स्त्रीने राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा यांना केला होता.राष्ट्रीय महिला आयोगाने मार्च २०२० च्या पहिल्या आठवड्यात महिला घरघुती अत्याचाराच्या सदर्भात एक अहवाल प्रसिद्ध केला,त्यामध्ये महिला अत्याचारच्या आणि हिंसेच्या संदर्भात दुपटीने वाढ झाल्याचे दिसून आले आहे. एकूण २३,७२२ प्रकरणे या संदर्भात दाखल झाली,राज्यानिहाय त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अनु.क्रं. | राज्य | एकूण दाखल केसेस |
|---|---|---|
| १ | उत्तरप्रदेश | ११,८७२ |
| २ | दिल्ली | २,६३५ |
| ३ | हरियाणा | १२६६ |
| ४ | महाराष्ट्र | १,१८८ |

आकडेवारी- राष्ट्रीय महिला आयोग २०२०

संयुक्त राष्ट्र संघटनेचे महासचिव अँटोनिओ गुटेरस यांनी देखील लॉकडाउन च्या काळात महिलांवरील अत्याचारात वाढ होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

**निष्कर्ष विश्लेषण**

कोरोना महामारीच्या काळात भारताबरोबरच जगातील इतर देशांमध्ये देखील महिलांचा अनेक प्रकारे छळ झाला. कुटुंबातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अस्थिरतेमुळे स्त्रिया आघातग्रस्त बनल्या आहेत.



Scanned with CamScanner

**शिफारशी**

प्रस्तुत शोध निबंधात कोरोंना काळातील महिलांच्या अत्याचाराच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे. या समस्या दूर करण्यासाठी खालील उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

1. पोलिस खात्यामार्फत विशेष पथक तयार करून,केवळ अशाच केसेस वर काम करणे.
2. स्त्रियांचा दर्जा उंचविण्यासाठी शासनामार्फत तिचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न करणे.
3. समाज रचनेत स्त्री-पुरुष समानतेची मानसिकता किंवा मनोभूमिका निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.त्यांचे शिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्य या दोन महत्वाच्या गोष्टी घडल्या पाहिजेत.
4. युनेस्को (UNESCO) च्या अंदाजानुसार जगभरातील १०७ देशांनी त्यांच्यासंपूर्ण देशात शिक्षण संस्थांचे कामकाज बंद ठेवले आहे.जगभरातील ८६१.७ दशलक्ष विद्यार्थ्यांना आणि तरुणांना याचे परिणाम भोगावे लागत आहेत. कोव्हिड-१९ च्या प्रसारामुळे कदाचित पुढे शिक्षणातील लिंगभेद अधिक वाढू शकतो. शाळा बंद असल्याचे सर्वात तीव्र दुष्परिणाम हे मुलींच्या शिक्षणा संदर्भाने दिसून येतात. उदाहरणार्थ- सिएरा लिओनने हे निदर्शनास आणून दिले की, इबोलाच्या महामारीनंतर मुलींच्या शाळागळतीचे प्रमाण वाढले होते.याचाही विचार शासकीय पातळीवर होणे आवश्यक आहे.
5. कोविड19 च्या काळात ज्या स्त्रियावर अत्याचार होत आहे ,त्याला तोंड देण्यासाठी अधिक संसाधनांची सोय करावी,पूरावा आधारित प्रक्रियांचा त्यात समावेश करावा.
6. महिलांना केंद्रस्थानी ठेऊन धोरणात्मक बदल, समस्यांचे निराकरण आणि रोगमुक्ती या बाबींची पूर्तता करावी.
7. जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या मार्गदर्शक तत्वांची अमलबजावणी करावी.

**संदर्भ**

1. दासगुप्ता लोपा (2002)- महिलांचे कुटुंबातील स्थान,महिला सबलिकरन,दारिद्र्य निर्मूलन व स्व:यंम सहाय बचत गट-
2. Sharlene Nagy Hesse-Biber (2007): Handbook of Feminist Research Theory and Praxis', Sage Publication, New Delhi.
3. Zubair Meenai, (2010): Women's Empowerment and Microcredit Emerging Spaces for Social Work Practice, The Indian Journal of Social Work, Tata Institute of Social Sciences Publication, Deonar,Mumbai, VOL. No. 71, Issue 1, January, 2010.
4. अदिती रथो, श्रुती जैन- भारतातील स्त्री आणि कोविड 19, 3एप्रिल 2020



Scanned with CamScanner